# “जीवन सुरक्षा ठेव योजना”

## ठेव योजनेचा उद्देश

- सभासद व सभासदांच्या वारसांस आर्थिक संरक्षण मिळणेसाठी.
- योजना फक्त मध्यम मुदत कर्जास लागू राहील.
- कर्जदार सभासद नोकरीत असताना मृत झाल्यास सभासदांच्या खात्यावरील जमा रक्कम वजा करून उर्वरीत मध्यम मुदत कर्ज संपूर्ण पणे या ठेव योजनेतून माफ करण्यात येईल.
- निवृत्तीनंतर सदर ठेव योजनेत जमा केलेली रक्कम बिनव्याजी परत करण्यात येईल .
- १00 टक्के अनुदान असणाऱ्या शाळेतील बिगर कर्जदार सभासद नोकरीत असताना मृत झाल्यास त्याच्या वारसास रू.२,00,000/-(अक्षरी ः रूपये दोन लाख फक्त) अर्थसहाय्य करण्यात येईल.
- कर्जदार मयत झाल्याची माहिती प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून त्याच्या कर्जा वरील व्याजाची आकारणी बंद करण्यात येईल किंवा मयत तारखेपासून कर्ज खात्यावर नांवे पडलेले व्याज सदर व्याज खाती परत वर्ग करण्यात येईल.
- ४0 टक्के पेक्षा अधिक व १00 टक्के पेक्षा कमी अनुदान प्राप्त शाळेतील बिगर कर्जदार सभासदांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
- जीवन सुरक्षा ठेव योजनेची रक्कम जमा होवून ३ महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर या योजनेचा लाभ देता येईल.

- सभासद मयत झाल्यानंतर ३ महिन्याच्या आत त्यांच्या वारसांनी सदर खाते बंद करण्यासंबंधी मागणी करणे आवश्यक आहे.
- सभासद मयत होण्यापुर्वी थकबाकीदार असेल तर थकबाकीचा हप्ता व व्याज रक्कम पूर्ण भरणा करणे आवश्यक आहे.
- मयत सभासदांना या योजनेचा लाभ दिल्यानंतर तेथून पुढे त्यांना ठेवीवरील व्याज व लाभांश देता येणार नाही.
- मध्यम मुदत कर्जा शिवाय इतर शिल्लक असलेले हायर पर्चेस कर्ज आकस्मित कर्ज व घर कर्ज याचा भरणा वारसांनी करणे आवश्यक आहे तसेच संचय कर्ज शिल्लक असल्यास संचय ठेवीतून सदर कर्ज वळते करण्यात येईल.